# दिव्यांग मुलांना मदत वाटप

**सातारा :** फिनोलेक्स पाइप्स आणि मुकुल माधव फाउंडेशनच्या वतीने सातारा जिल्ह्यातील १०० दिव्यांग (सेरेब्रल पाल्सीग्रस्त) मुलामुलींना व्हील चेअर, कमोड खुर्ची वितरण करण्यात आले.

या कार्यक्रमासाठी फिनोलेक्स व मुकुल माधव फाउंडेशनच्या रितू छाब्रिया, खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले, पुणे विभागाचे महसूल उपआयुक्त श्याम देशपांडे, जिल्हाधिकारी अश्विन मुद्गल, दमयंतीराजे भोसले, रुबी हॉल क्लिनिकचे डॉ. परवेझ ग्रँट, फारूख कूपर, जाल कूपर आदी उपस्थित होते. यावेळी या विशेष मुलांसाठी सेवा देणाऱ्याया सर्व शिक्षक-शिक्षिकांचा सत्कार रितू छाब्रिया यांच्या हस्ते करण्यात आला. समारंभाचे प्रास्ताविक बन्सी शेठ यांनीकेले. यावेळी सचिन कुलकर्णी यांनीही मनोगत व्यक्त केले. बी. आर. मेहता यांनी आभार प्रदर्शन केले.